आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

८ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीचा प्रचार तापला

- राज्याच्या विकासाला महायुती सरकारच चालना देऊ शकेल, असं भाजपाच्या प्रचारसभेत ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- महाविकास आघाडी सरकारने बंद केलेल्या योजना पुन्हा सुरु करण्याचं केंद्रीय मंत्री अमित शहा यांचं सांगलीतल्या सभेत आश्वासन

- ईडीच्या कारवाईतून सुटका करून घेण्यासाठी महायुती सरकारमध्ये सामील झाल्याच्या वृत्ताचं छगन भुजबळ यांच्याकडून खंडन

**आणि**

- भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यानच्या चार टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात

**<><><><><>**

राज्यात निवडणुकीचा प्रचार तापला आहे. सर्व पक्षांच्या बड्या नेत्यांच्या सभा ठिकठिकाणी होत आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी तर्फे आपापल्या कामांचा लेखाजोखा मतदारांसमोर मांडतानाच विरोधकांवर आरोप, टीका करण्यात येत आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज धुळ्यात जाहीर सभा घेतली. महाराष्ट्राच्या विकासाला चालना देण्याचं काम केवळ महायुतीचं सरकारच करु शकतं, असं त्यांनी सांगितलं. महिला सक्षमीकरण, युवकांना रोजगार, आदिवासींचे हक्क इत्यादी क्षेत्रात युती सरकारने राबवलेल्या योजनांचा उल्लेख त्यांनी केला. महाविकास आघाडीने अनेक विकासप्रकल्पांच्या

मार्गात खोडा घातला असा आरोप त्यांनी केला. तसंच मविआमधे आपसात भांडणं असल्याबद्दल त्यांनी टीका केली. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा आपल्या सरकारने मिळवून दिल्याची आठवण करुन देत त्यांनी डबल इंजिन सरकार निवडून देण्याचं आवाहन मतदारांना केलं. वाढवण इथं विमानतळ बांधण्याच्या मागणीचा विचार आचारसंहिता संपल्यानंतर करु असं आश्वासन त्यांनी दिलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचंही भाषण यावेळी झालं. शेतकऱ्यांना पाणीपुरवठा, औद्योगिक विकास, रस्ते आणि पायाभूत सुविधा विकास  अशी आश्वासनं त्यांनी दिली. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातली ही त्यांची पहिलीच प्रचारसभा होती. त्यानंतर नाशिकमधे त्यांची सभा होत आहे. या सभेत भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी डबल इंजिन सरकारसाठी महायुतीला मतदान करण्याचं आवाहन मतदारांना केलं. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आमगाव इथं प्रचार सभा घेत आहेत.

**<><><><><>**

भारताला सर्व क्षेत्रात सर्वोत्तम बनवणं हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं लक्ष्य असून हे एनडीए सरकारच करु शकतं असं केंद्रिय मंत्री अमित शहा यांनी सांगली जिल्ह्यात शिराळा इथं प्रचारसभेत सांगितलं. महायुतीच्या उमेदवारांना मतदान करण्याचं आवाहन त्यांनी केलं. महाविकास आघाडीनं बंद केलेल्या योजना पुन्हा सुरु केल्या जातील, असं सांगून त्यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर टीका केली. मोदी यांनी महाराष्ट्रासाठी १० लाख १५ हजार कोटी रुपये दिले असल्याचं शहा यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

माझी लाडकी बहीण, माझा लाडका शेतकरी या योजना महायुती सरकारने आणल्या. परंतु काँग्रेसच्या सरकारने कर्नाटक, राजस्थान येथे अशा योजनांची आश्वासनं पूर्ण केली नाहीत, हे सर्वांना माहीत आहे, असं लोक जाणतात, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नागपूर मधे सांगितलं.

**<><><><><>**

एकनाथ शिंदेंच्या सरकारने महाराष्ट्र अधोगतीकडे नेला आहे. त्यामुळे राज्याला पुन्हा प्रगतीच्या मार्गावर न्यायचं असेल, तर आपण एकत्रितपणे महाविकास आघाडीच्या पाठीमागे उभं राहिलं पाहिजे,' असं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूणमध्ये केलं. चिपळूण विधानसभा मतदारसंघातले पक्षाचे उमेदवार प्रशांत बबन यादव यांच्या प्रचारासाठीच्या सभेत ते बोलत होते.

**<><><><><>**

**वाशिम** जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी आज गृहमतदान होत आहे. निवडणूक अधिकारी दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन बॅलेट पेपरद्वारे मतदानाची प्रक्रिया राबवत आहेत. गृहमतदानासाठी रिसोड मतदारसंघात ५४६, वाशिम मतदारसंघात ४३२ तर कारंजा मतदारसंघात ४७९ मतदारांनी नोंद केली आहे.

**धुळे** शहरात १० नोव्हेंबर रोजी गृहमतदान होणार आहे. यासाठी चौदा पथकं नेमण्यात आली असून प्रत्येक पथकामध्ये दोन मतदान अधिकारी, एक पोलीस कर्मचारी आणि सूक्ष्म निरीक्षक आणि एक व्हिडीओ ग्राफर असणार आहे. जे मतदार या दिवशी मतदान करू शकणार नाहीत त्यांच्यासाठी १२ नोव्हेंबर रोजी मतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**जळगाव** जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा प्रशासन विविध उपक्रम राबवत आहे. महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेने मतदान जागृतीसाठी रील्स बनवण्याची स्पर्धा आयोजित केली आहे. उत्तम रील्स बनवणाऱ्यांना पारितोषिक दिलं जाणार असल्याचं प्रशासनानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज अमरावती जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

ईडीच्या कारवाईतून सुटका करून घेण्यासाठी महायुती सरकारमध्ये सामील झाल्याच्या वृत्ताचं राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी खंडन केलं आहे. आपण ओबीसी असल्यामुळे आपल्यावर कारवाई झाली असं भुजबळ यांनी म्हटल्याचं वृत्त ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांनी लिहीलेल्या पुस्तकाचा हवाला देत एका दैनिकाने छापलं आहे. मात्र या दैनिकाबरोबर आपली काही मुलाखत झालेली नाही, आपण कोणतंही पुस्तक लिहीलेलं नाही, तसंच ईडीच्या कारवाईचा आणि आपण सरकारमधे सामील होण्याचा काहीही संबंध नाही असं स्पष्टीकरण भुजबळ यांनी आज नाशिकमधे पत्रकारपरिषदेत दिलं. महाराष्ट्र सदन घोटाळ्यात आपल्याला क्लीन चिट मिळाली तेव्हा आपण महाविकास आघाडी सरकारमधे होतो. तसंच ओबीसी व्यतिरिक्त इतर समाजातल्या राजकीय नेत्यांचीही ईडीमार्फत चौकशी होत आहे, असं ते म्हणाले. विकासाच्या मुद्यावर आपण महायुती सरकारमधे सहभागी झालो आहोत असं त्यांनी स्पष्ट केलं. राजदीप

सरदेसाई यांचे पुस्तक निवडणुकीनंतर आपण वाचू आणि त्यानंतर कायदेशीर भूमिका घेऊ असंही भुजबळ यांनी सांगितले.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जागृतीसाठी राबवण्यात येणाऱ्या स्वीप कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय संचार ब्यूरो आणि निवडणूक आयोगाच्या वतीनं एक फिरतं प्रदर्शन आजपासून सुरु होणार आहे. प्रदर्शन लावलेल्या या गाड्या १५ निवडक जिल्ह्यांमधे मतदानविषयक जनजागृतीचा संदेश घेऊन जाणार आहेत. मुंबईत होणाऱ्या या सोहळ्यात भारत निवडणूक आयोग तसंच राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे वरीष्ठ अधिकारी, चित्रपट, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातल्या मान्यवरांच्या उपस्थितीत मतदार जागृती उपक्रमांचा प्रारंभ होणार आहे. याच कार्यक्रमात या फिरत्या प्रदर्शन वाहनांना हिरवा झेंडा दाखवला जाणार आहे.येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान असल्याने राज्यात सर्वत्र सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

<><><><><>

भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यानच्या चार टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज रात्री डर्बनमध्ये होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता सामन्याला सुरूवात होईल. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली दक्षिण अफ्रिकेच्या दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघाला परदेशी भूमीवर उत्तम कामगिरी दाखवण्याची संधी आहे. या संघानं घरच्या मैदानावर बांग्लादेश विरूद्धची टी-20 मालिका ३-० नं जिंकली होती. सध्या भारतीय संघ टी-20 संघ क्रमवारीत अव्वल स्थानावर तर दक्षिण अफ्रिका सहाव्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

कतारमधे दोहा इथं सुरू असलेल्या जागतिक बिलियर्ड्स अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज पंकज अडवाणीचा सामना सौरव कोठारीशी होणार आहे. गतविजेत्या पंकजनं काल रात्री ध्रुव सितवालाचा ४-३ असा पराभव केला तर सौरव कोठारीनं ऑस्ट्रेलियाच्या स्टीव्ह मिफसूदला नमवलं. दुसऱ्या उपांत्य फेरीत इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलचा सामना सिंगापूरच्या पीटर गिलख्रिस्टशी होणार आहे.

**<><><><><>**

कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किरण जॉर्जनं पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत त्याचा सामना थायलंडच्या कुनलावुत विटिडसरनशी होणार आहे.

उपांत्यपूर्व फेरीत त्यानं जपानच्या ताकुमा ओबायशीचा २१-१४, २१-१६ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. त्याआधी उपउपांत्यपूर्व फेरीत त्यानं तैवानच्या ची यु जेनचा २१-१७, १९-२१, २१-१७ असा पराभव केला होता. या स्पर्धेत भाग घेणारा तो एकमेव भारतीय बॅडमिंटनपटू आहे.

**<><><><><>**

अलिगड मुस्लिम विद्यापीठाला अल्पसंख्यक संस्थेचा दर्जा द्यायला सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शवली असून १९६७ सालच्या अजीज बाशा विरुद्ध केंद्र सरकार खटल्या प्रकरणातला निर्णय रद्दबातल ठरवला आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठाने चार विरुद्ध तीन अशा बहुमताने हा निर्णय घेतला. कायद्याद्वारे स्थापित झालेली संस्था अल्पसंख्यक असल्याचा दावा करू शकत नाही असं १९६७ च्या निर्णयात सांगण्यात आलं होतं. तर केवळ या कारणामुळे कुठल्याही संस्थेचा अल्पसंख्यक दर्जा नाकारला जाऊ शकत नाही असं न्यायालयाने आजच्या निर्णयात म्हटलं आहे. संस्थेची स्थापना

कुणी केली हे महत्त्वाचं असून कलम ३० नुसार संस्था अल्पसंख्यक दर्जा मिळवण्यावर दावा करू शकते असं न्यायालयाने म्हटलं आहे. अधिक तपशीलाचा तपास करण्यासाठी हे घटना पीठाने हे प्रकरण नियमित खंडपीठाकडे सोपवलं आहे. सात सदस्यीय पीठातल्या सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यासह न्यायमूर्ती संजीव खन्ना, जे बी पारडीवाला आणि मनोज मिश्रा यांनी निर्णयाच्या बाजूनं तर न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांनी विरोधात मत दिलं.

**//<><><><><>//**